


RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com

पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-002 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thuseday 29 April 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ००२ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


## दैनिक स्वराज्यदूत चा वर्धापनदिन छोटेखानी कार्यक्रमात उत्साहात साजरा

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------







दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी नाशिक विभागीय कार्यालयात दैनिक स्वराज्यदूत या दैनिकाचा २ रा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला नाशिक महानगर पालिका घन कचरा व्यवस्थापन विभागाचे पर्यवेक्षक मा. विजय अण्णा जमधडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. अंबड येथील नामांकित क्लासेसचे संचालक श्री. गुंजन पाटील नाशिक महानगर पालिका घन कचरा व्यवस्थापन विबागाचे अधिकारी श्री. कमलाकर दिवे, मा. बाळासाहेब मुर्तडक, नाशिक एम आय डी सी मधील इंडोलाईन कंपनीचे परचेस अधिकारी श्री. विनीत पाटील त्याचसोबत राजेंद्र शेळके, मोहसीन सय्यद, अरुण सुरवाडे, नाशिक शहरातील शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे उप महानगर प्रमुख श्री. राजेंद्र गोतिसे, प्रभाग क्रमांक २९ चे समन्वयक श्री. विनोद भाऊ गोसावी हे सर्व उपस्थित होते. श्री विजय भाऊ जमधडे यांनी दैनिकाचे संपादक आणि निवासी संपादक यांना शाल आणि श्रीफळ देऊन त्यांचा यथोचित सत्कार केला. आपल दैनिक हे सर्व सामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आजवर प्रयत्न करत आहे आणि यापुढेही असेच करीत राहील अशी अपेक्षा या प्रसंगी जमधडे यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाला नाशिक आणि संपूर्ण महाराष्ट्रामधून वार्ताहर प्रतिनिधी आणि सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नाशिक मधील सर्व मित्र परिवार आणि शुभचिंतक यांनी विशेष परिश्रम घेतले. आज आम्ही जे शिवधनुष्य उचलले आहे त्यासाठी तुमच्या सर्वांची साथ आणि सोबत राहिली तर आम्ही नक्कीच आमच्या परीने प्रयत्न करू आणि सर्व इच्छा आकांक्षा पूर्ण करण्याचा प्रयन करू आणि त्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे उद्गार या प्रसंगी संपादक मा भास्कर देवरे यांनी व्यक्त केले. निवासी संपादक श्री. संतोष मोहिते यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले आणि आम्ही आमच्या कर्तव्यात कधीही कसूर करणार नाही सर्वसामान्य जनतेच्या व्यथा आणि अडीअडचणी यांना न्याय मिअळून देण्याचे कार्य अहोरात्र करत राहू असे प्रतिपादन केले. सोबत सर्व जाहिरातदार बातमीदार प्रतिनिधी आणि वार्ताहर यांचे विशेष आभार मानले.

## रत्नागिरीतील पतितपावन मंदिरात ज्येष्ठ भजनी बुवांना मंदिरात प्रवेश नाकारुन भजनास अटकाव

सुनील बाचरे
अंबरनाथ प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------




रत्नागिरीत स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांनी बांधलेल्या ऐतिहासिक पतितपावन मंदिरात प्रदीप चंद्रकांत उर्फ बाबा परुळेकर यांनी ज्येष्ठ भजनी बुवांना मंदिरात प्रवेश नाकारून भजनास अटकाव केल्या प्रकरणी संतापाची लाट उसळली आहे. मंदिराचे विश्वस्त असलेल्या बाबा परुळेकर यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी संतप्त झालेल्या भजनी बुवांनी रत्नागिरी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार दाखल केली आहे. पतितपावन मंदिरात बहुजन समाजातर्फे २६ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याविषयी मंदिर व्यवस्थापनाला २५ मार्च २०२५ रोजी पत्राद्वारे कळवण्यात आले होते. त्यानुसार दि. २७ मार्च २०२५ रोजी शिवरात्रीला सायंकाळी ७ ते ८ या वेळेत भजनाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. मात्र दि. २६ एप्रिल रोजी भजनी बुवा सुरेंद्र यशवंत घुडे, संजय धाकू मेस्त्री, कौस्तुभ नागवेकर, सुदेश भरत नागवेकर, मनोज भाटकर, जयवंत बोरकर आणि इतर ज्येष्ठ भजनी बुवांनी हार्मोनियम, टाळ, पखवाज, मृदंग यासाहित्यासह मंदिरात प्रवेश केला. त्यावेळी बाबा परुळेकर यांनी त्यांना अटकाव करत "हे मंदिर आमचे आहे, तुम्ही येथे भजन करू शकत नाही," असे सांगत त्यांनी भजनी बुवांना मंदिरात प्रवेश नाकारला. असे भजनी बुवांनी पोलिसांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. या घटनेने भजनी बुवांच्या धार्मिक भावना दुखावल्या असून, त्यांनी बाबा परुळेकर यांच्यावर मानहानीचा आरोप केला आहे. ८६ वर्षीय जयवंत बुवा बोरकर यांनी सांगितले, " माझ्या ६३ वर्षांच्या भजन सेवेत मंदिरातून भजनी बुवांना बाहेर जाण्यास सांगण्याची ही पहिलीच वेळ आहे. असे कधीच कुठे ऐकले नव्हते, ते आज अनुभवायला मिळाले." भजनी बुवांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, बाबा परुळेकर यांनी बहुजन समाजातील ज्येष्ठांना मंदिरात प्रवेश नाकारून त्यांचा अपमान केल्याने भजनी बुवांनी बाबा परुळेकर यांच्याविरोधात रत्नागिरी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. त्यांनी बाबा परुळेकर यांच्यावर कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे. मात्र याबाबत पोलिसांकडून कोणती कारवाई करण्यात येते, याकडे आता शहरवासियांचे लक्ष लागून राहिले आहे.

## "पाकिस्तानचं पाणी बंद करायला २० वर्षे लागतील", कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवारांचा मोदी सरकारला टोला

**विशेष वृत्त सेवा**
**दैनिक स्वराज्यदूत**




काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरात तणावाचं वातावरण आहे. हा हल्ला म्हणजे केंद्र सरकार व गुप्तचर यंत्रणा देशाला सुरक्षा पुरवण्यात सपशेल अपयशी ठरल्याचं उदाहरण असल्याची टीका विरोधक करत आहेत. दरम्यान, दहशतवाद्यांना खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानविरोधात केंद्र सरकार आक्रमक झालं आहे. भारताने उभय देशांमधील सिंधू जलकरार स्थगित केला आहे. तर, भाजपा व त्यांच्या मित्रपक्षांमधील नेते पाकिस्तानचं पाणी बंद करण्याबाबत वक्तव्ये करत आहेत. मात्र, पाकिस्तानचं पाणी बंद करायला केंद्र सरकारला २० वर्षे लागतील असं वक्तव्य कॉंग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी केलं आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या प्रसारमाध्यमांसमोर म्हणाले होते की "भारत-पाकिस्तान युद्ध होऊ नये". त्यावर भाजपाने पलटवार करत म्हटलं की "हे लोक (काँग्रेस) पाकिस्तानची भाषा बोलू लागले आहेत". त्यावर विजय वडेट्टीवार म्हणाले, "तुमची (मोदी सरकार) युद्ध करायची तयारी असेल तर करा. पाकिस्तानने तर थेट युद्धाचं आव्हान केलं आहे".

**"एका मुख्यमंत्र्याच्या बोलण्याने पंतप्रधानाची भाषा बदलते का?"**

काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले, "एखादे मुख्यमंत्री काहीतरी म्हणाले म्हणून पंतप्रधानांची भाषा बदलू शकते का? ठीक आहे, सिद्धरामय्या म्हणाले असतील की युद्ध नको. परंतु, तुमची (केंद्र सरकार) युद्धाची तयारी आहे का? तुमची युद्धाची तयारी असेल तर तुम्ही युद्ध करा. पाकिस्तानने युद्धाचं खुलं आव्हान दिलं आहे. तुम्ही लोक समझोत्याची भाषा करता तेव्हा ती कोणाची भाषा असते? ती पाकिस्तानची भाषा असते का? उभय देशांमध्ये आज काय स्थिती आहे पाहा. हे जुनंच युद्ध आहे."

**पाकिस्तानचं पाणी बंद करायला २० वर्षे लागतील : वडेट्टीवार**

काँग्रेसचे आमदार म्हणाले, "युद्ध कोणाच्या फायद्याचं असतं का? युद्धाने केवळ मोठं नुकसान होतं. तुम्ही काहीही बोलता आणि पसरवता. तुम्ही लोक पाकिस्तानचं पाणी बंद करायची भाषा करता. अरे तुम्हाला पाकिस्तानचं पाणी बंद करायला २० वर्षे लागतील. ते पाणी अडवण्यासाठी नद्यांवर धरणं बांधावी लागतील. हे लोक केवळ लोकांचं लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी, त्यांना भरकटवण्यासाठी काहीही बाता मारत आहेत."

## नाशिक जिल्ह्यातील धरणसाठा 33 टक्क्यांवर, आठ धरणांत 20 टक्क्यांहून कमी पाणी

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------



उन्हाची तीव्रता प्रचंड वाढत असल्याने जिल्ह्यातील धरणसाठा कमी होत आहे. जिल्ह्यातील सर्व २४ धरणांमध्ये सध्या २२ हजार ७५ दशलक्ष घनफूट अर्थात ३३ टक्के जलसाठा आहे. माणिकपुंज हे धरण कोरडेठाक झाले असून अन्य आठ धरणांमध्ये २० टक्क्यांहून कमी जलसाठा असून ती रिक्त होण्याच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहेत. मागील पावसाळ्यात जिल्ह्यात समाधानकारक पर्जन्यवृष्टी झाली. त्यामुळे धरणांसह लहान-मोठे तलाव, बंधारे भरलेले होते. या एकंदर वातावरणात पाणी टंचाईची फारशी तीव्रता भासणार नसल्याचे वाटत होते. परंतु, मार्चनंतर पारा चढला, तसे अनेक भागात टंचाईचे चटके बसू लागले. धरणातील पाण्याच्या बाष्पीभवनाचा वेग देखील वाढला.

प्रिल महिन्यात तापमानाने सर्वोच्च पातळी गाठली. कित्येक दिवस पारा ४० अंशांच्या पुढे राहिला. उष्णतेची लाट अनेक दिवस कायम राहिली. सद्यस्थितीत एप्रिलच्या अखेरीस धरणांमध्ये गतवर्षीच्या तुलनेने १० टक्के अधिक जलसाठा आहे. परंतु, तेव्हा दुष्काळी स्थिती होती. धरणेही पूर्ण क्षमतेने भरली नव्हती. गतवर्षी एप्रिलच्या अखेरीस धरणांमध्ये १५ हजार २६ दशलक्ष घनफूट म्हणजे २२ टक्के जलसाठा होता. प्रशासनाच्या माहितीनुसार पालखेड धरणात १६३ दशलक्ष घनफूट (२४ टक्के), ओझरखेड ५२३ (२४), दारणा २९५४ (४१ टक्के), भावली ३९९ (२७), मुकणे ३३५१ (४६), वालदेवी ५१४ (४५), नांदुरमध्यमेश्वर ८४ (३२ टक्के). चणकापूर ७८१ (३२), हरणबारी ४५१ (३८), केळझर १८८ (३२), गिरणा ५३४६ (२८), पुनद धरणात ९२७ दशलक्ष घनफूट म्हणजे ५६ टक्के जलसाठा आहे.

**गंगापूरमध्ये ५५ टक्के पाणी**

नाशिक शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणात तीन हजार १३६ दशलक्ष घनफूट (५५ टक्के) जलसाठा आहे. या समूहातील काश्यपीत १३९१ (७५ टक्के), गौतमी गोदावरी १७२ ( नऊ टक्के), आळंदी १८७ (२२ टक्के) जलसाठा आहे. मागील वर्षी याच काळात गंगापूरमध्ये ४१ टक्के जलसाठा होता. तेव्हा पाणी कपातीची गरज महापालिकेने मांडली होती. निवडणूक __वर्षात तसा निर्णय घेण्यास राजकीय मंडळींनी विरोध केला. यंदा गतवेळच्या तुलनेत १४ टक्के अधिक जलसाठा असल्याने तसा विचार करावा लागणार नसल्याचे सांगितले जाते.

**कमी जलसाठा असणारी धरणे**

माणिकपुंज हे धरण कोरडेठाक पडले असून गौतमी गोदावरी (नऊ टक्के), करंजवण (१६), वाघाड (आठ टक्के), पुणेगाव (दोन), तिसगाव (नऊ), कडवा (१८ टक्के), भोजापूर (एक टक्का), नाग्यासाक्या (नऊ टक्के) या आठ धरणात एक ते २० टक्क्यांदरम्यान जलसाठा आहे.

## नाशिक मध्ये सिडको परिसरात पुन्हा एक हत्या

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------




शहरात हत्यांचे सत्र चालूच आहे. सिडकोतील कामटवाडे परिसरात संत कबीर नगरातील १७ वर्षाच्या विधीसंघर्षित मुलाची डोक्यात दगड टाकून हत्या करण्यात आली. पूर्ववैमनस्यातून ही हत्या झाली असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. गंगापूर हद्दीतील एका हत्येच्या गुन्ह्यात समावेश असल्याच्या संशयावरुन विधीसंघर्षित बालकास बालसुधार गृहात पाठविण्यात आले होते. आठ दिवसांपूर्वी तो तेथून बाहेर आला होता. जीवाला धोका असल्याबाबत त्याने आई वडिलांना सूचित करून सिडकोतील कामठवाडे येथे एका मित्राच्या घरी तो राहत होता. सोमवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास तो कामठवाडे येथील स्मशानभूमी रस्त्याने जात असतांना पाच ते सहा जणांनी त्याला गाठले. त्याला मारहाण केली. दगड आणि फरशी डोक्यात टाकल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनास्थळी परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, सहायक आयुक्त शेखर देशमुख, अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राकेश हांडे यांनी पाहणी केली. अंबड पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**अंबड परिसरात वाढते गुन्हे**

अंबड येथील सराफ व्यावसायिकाच्या दुकानावर भरदिवसा पडलेल्या दरोड्यानंतर तत्कालीन पोलीस निरीक्षक सुनील पवार यांची बदली झाली. सध्या राकेश हांडे निरीक्षक असून त्यांच्या कार्यकाळात अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत तिसरी हत्या झाली आहे. याआधी होळीच्या रात्री शुभम पार्क परिसरात आणि संभाजी स्टेडियमजवळ सिगारेटच्या वादातून हत्या झाल्या होत्या. पोलिसांचा कोणताही धाक गुंडांवर नसल्यानेच सलग हत्या होत असल्याची नागरिकांची भावना आहे.

संपादकीय

# पश्मिन्याचे पंख

पहलगाममध्ये २६ पर्यटक आणि एका स्थानिकाचा बळी घेणाऱ्या नृशंस हल्ल्यानंतर तातडीने फटका बसला आहे तो काश्मीरच्या पर्यटनाला. असे अनेक आघात काश्मीर खोऱ्याला आजवर सहन करावे लागले आहेत. त्या प्रत्येक वेळी पर्यटनावर अवलंबून असलेल्या काश्मिरींच्या आकांक्षांची राख झाली, पण भारतीयांना आपल्या देशाचा अविभाज्य भाग असलेल्या या नंदनवनाचे आकर्षण इतके की, त्या राखेतूनही काश्मीरच्या पर्यटनाने उभारी धरली. तसे कदाचित आताही होईल. पाकिस्तान-पुरस्कृत काश्मिरी दहशतवाद, त्यास अनेक वर्षे काही स्थानिक नेत्यांकडूनही- कुटिलपणाने किंवा बेअक्कलपणे- होणारे सहकार्य, त्या राज्यातल्या बेरोजगारांना हेरून फुटीरतावादाच्या नादी लावण्याचे दहशतवाद्यांचे डावपेच, ते गेल्या सात-आठ वर्षांपर्यंत यशस्वी झाल्याने सुरक्षा दलांवर आणि अमरनाथ यात्रेकरूंच्या तांड्यांवर बेछूट दगडफेक करण्यात गल्लोगल्लीच्या तरुणांचा सहभाग... या साऱ्याला मनोमन वैतागलेले नागरिक भारताच्या या राज्यात होते आणि राज्याचा दर्जा गेला तरी असे नागरिक आजही आहेत, याचा पुरावा म्हणजे काश्मीरचे वाढते पर्यटन. पण पर्यटक म्हणून गेलेले लोक आजवर तसे सुरक्षित असत. 'बंद' मुळे एखाददोन दिवस फुकट जाणे किंवा खोऱ्यातील गडबड अधिक वाढली म्हणून सहलच अर्ध्यावर रद्द करावी लागणे असे चटके काही पर्यटकांनी यापूर्वी भोगले असतील. मात्र पर्यटकांचा जीव सुरक्षित नाही, अशी दहशत पहिल्यांदाच पसरल्यामुळे- आणि समाजमाध्यमांवरील प्रचारखोर या दहशतीविरुद्ध उपाय म्हणून भलभलते काहीबाही सुचवू लागल्यामुळे- काश्मीरला जाऊ इच्छिणाऱ्यांचा गोंधळ वाढला आहे हे निश्चित. पहलगामच्या बेलगाम हत्याकांडानंतर सरकारच्या आणि तपास यंत्रणांच्या पातळीवर उपाय होत राहातील; पण 'एकदा तरी काश्मीर पाहावे, जमल्यास पुन:पुन्हा तिथे जावे' या भारतीय ऊर्मीवरच आता घाला येतो आहे का, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. ही अशी यापूर्वी कधीही न आलेली वेळ निव्वळ तुकडा-तोड निर्णय घेण्याची नसते. अभूतपूर्व संकटातून मार्ग काढण्यासाठी माणूस काय किंवा समाज काय, आत्मपरीक्षणही करतो. सरकारच्या पातळीवर होणाऱ्या उपायांचे परिणाम सर्वांनाच झेलावे लागतील हे खरेच, पण शाश्वत शांतता हवी असेल तर निव्वळ राजकीय, पोलिसी वा लष्करी आणि प्रशासकीय उपायांइतकीच सामाजिक बाजूही महत्त्वाची असते. काश्मीरच्या शांततेची ही सामाजिक बाजू भक्कम करण्याची जबाबदारी सर्वच भारतीयांवर आहे. मग ते काश्मीरमध्ये राहणारे असोत वा चार दिवसांच्या मौजमजेसाठी तेथे जाणारे असोत किंवा तिथे प्रत्यक्ष गेले काय, न गेले काय- काश्मीर आपलेच आहे आणि त्या भागाचाही विकास आपल्याला हवा आहे, असे मानणारे असोत. काश्मीरचे लोक आणि भारताच्या अन्य प्रांतांतले लोक यांच्या संबंधांचा विचार इथे महत्त्वाचा ठरतो. हे संबंध आजवर विषम राहिलेले आहेत. विश्वासातली, भारतीय म्हणून एकमेकांशी नात्यातली ही विषमता फार पूर्वीपासूनची आहे. तिची उदाहरणे केवळ शोधनिबंधांमध्ये किंवा तत्सम अभ्यासवाङ्मयात नव्हे तर जुन्या चित्रपटांसारख्या सांस्कृतिक वारशातही सापडतात. काश्मीरच्या सामीलनाम्यानंतर अडीच वर्षांच्या आत लोकप्रियतेची शिखरे गाठणारा राज कपूरचा 'बरसात' पाहा. दोन काश्मिरी स्त्रिया आणि त्यांना भुरळ पाडणारे दोघे काश्मीरबाहेरचे पुरुष यांची ती कहाणी. 'परदेसी'वर विश्वास ठेवूच नये असे या स्त्रियांना सांगणारे अनेक, तरीसुद्धा दोघीही प्रेमासाठी झुरतात. अखेर एकीचे प्रेम सफल होते- तेही तिचा प्रियकर प्रामाणिक असतो म्हणूनच; पण दुसरीचा जीव गेल्यावर तिला खेळवणाऱ्या पुरुषाला उपरती होते ती काहीच उपयोगाची नसते. 'कश्मीर की कली' मध्ये दल सरोवरात फुले विकणाऱ्या गरीब शर्मिला टागोरचे भाग्य राजघराण्यातल्या आणि आईपासून दूर राहण्यासाठी काश्मीरमध्ये आलेल्या शम्मी कपूरमुळे उजळते; तर 'जब जब फूल खिले' मधल्या गरीब काश्मिरी घोडेवाल्या शशी कपूरचे प्रेम अव्हेरणारी श्रीमंत घरची पर्यटक नंदा, अखेरीस त्याची माफी मागते. यानंतरच्या चित्रपटांमध्ये काश्मीर आले ते निव्वळ निसर्गसौंदर्यापुरते- 'खूबसूरत तसबीर' म्हणून. पण १९९२ मधल्या 'रोजा'ने, त्याहीनंतरच्या 'मिशन कश्मीर' ने दहशतवाद्यांवर साहसी मात करण्याचे स्वप्न दाखवले, तर २०१४ मधल्या 'हैदर' ने शेक्सपिअरच्या हॅम्लेटला पडलेला अस्तित्वाचा सवाल आजच्या काश्मीरसंदर्भात प्रेक्षकांपुढे मांडला. हिंदी चित्रपट हा स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजाचा 'मुख्य प्रवाह' हे समीकरणच गडगडू लागेपर्यंत काश्मीरकडे पाहण्याची या चित्रपटांची दृष्टी एक तर अनाठायी दया-करुणेची, नाही तर काश्मीरला निव्वळ एक निसर्गसुंदर पार्श्वभूमी मानण्याची आणि अलीकडे काश्मीरकडे 'समस्या' म्हणून पाहण्याची होती, असे दिसून येते. याच प्रवृत्ती आजसुद्धा पर्यटकांमध्ये आहेत, हे अगदी कालपरवाच्या प्रतिक्रियांतूनही उघड होते आहे- 'काश्मिरी लोक खूप अगत्यशील आहेत, चांगले आहेत. पर्यटनावरच त्यांचे पोट अवलंबून असल्याची जाणीव त्यांना आहे' अशा करुणामय प्रतिक्रिया यांत आघाडीवर आहेतच. पण 'आमची ट्रिप एकदमच 'स्मूथ' झाली होती' म्हणत, भारताच्या या अविभाज्य भागात फक्त पर्यटकाची भूमिका निभावणारेही नागरिकही आहेत... आणि 'जालीम उपाय' सुचवणारे तर गेल्या दोनतीन दिवसांत प्रचंड संख्येने दिसताहेत. या जालीम उपायांची ऊर्मी केवळ आजकालची आहे असे अजिबात नाही. अधूनमधून ती भारताच्याच अन्य राज्यांमध्ये राहणाऱ्या काश्मिरींविरुद्ध व्यक्तही होत असते. देशाच्या कोणत्याही भागात रहिवासाचा आणि व्यवसायाचा हक्क २०१९ च्या ऑगस्टनंतर तर जितका अन्य राज्यांतल्या लोकांचा आहे तितकाच काश्मिरींचाही आहे. 'अनुच्छेद ३७०' निष्प्रभ झाल्याने त्यात कमीजास्त काही उरलेले नाही. पण शिकण्यासाठी किंवा 'जगायला' अन्य राज्यांत येणाऱ्या/ यावे लागलेल्या काश्मिरींना संशयाच्या नजरांपासून ते मारहाणीपर्यंत सारे काही- २०१९ च्या आधी आणि नंतरही- झेलावे लागलेले आहे. यातून उघड होणारे कटू सत्य असे की, काश्मिरी लोक 'आपल्यासारखेच' असू शकतात, यावर आपला विश्वास नाही. तो नसण्याचा दोषारोप निव्वळ काश्मिरींवर करून कसे चालेल? टाळी एकाच हाताने कशी वाजेल? 'जम्मूपासून आम्ही पुढे आठ/दहा दिवस एकच गाडी केली होती- चालक फार चांगला मिळाला होता आम्हाला' अशा अनुभवांचे कारण हे फक्त आम्हीच नशीबवान, असे कसे असू शकेल? पर्यटक म्हणून आपला काश्मीरशी संबंध काही दिवसांपुरताच येणार हे खरे. पण भारताचे नागरिक म्हणून, भारताच्या या अविभाज्य भागाशी आणि त्यातल्या नागरिकांशी आपला संबंध एरवीही असायलाच हवा. तो कसा असावा हे फक्त सत्ताधाऱ्यांनी, फक्त सीमेपलीकडच्या आणि अलीकडच्या दहशतवाद्यांनी आणि फक्त या किंवा त्या टोकाची मते असणाऱ्या काहींनी का म्हणून ठरवायचे? ते आपणच ठरवावे लागेल. सर्वच्या सर्व भारतीय नागरिकांनी आपसांत किमान समतेची वर्तणूक ठेवावी, ही आपल्या राज्यघटनेची अपेक्षा आहे, त्या अपेक्षेला जागल्यामुळेच आपल्या राष्ट्राचा सांविधानिक पाया भक्कम राहू शकणार आहे, एवढा विवेक बाळगावा लागेल. काश्मीरच्या सहलीनंतर हॉटेल-व्यवस्थापकांचे,

वाहनचालकांचे मोबाइल क्रमांक आपल्या संपर्कयादीत नुसतेच उरतात; तिथून आणलेली क्रिकेटची बॅटही जुनी होते; अक्रोड/केशर संपून जातात; पण हौसेने आणि घासाघीस करून आणलेली पश्मिना शाल मात्र टिकते, उपयोगीसुद्धा पडते. तिच्या लोकरीचा तो पिसासारखा स्पर्श हवाहवासा असतो. ते उबदार वस्त्र जपले जाते, नीट हाताळले जाते... अशीच काश्मीरचीही जपणूक करायची तर, पाखरांनी आपापले पंख मिटल्यासारखी नुसती आपल्याच अंगाभोवती शाल लपेटून चालणार नाही- पाखरेसुद्धा पंख पसरल्याखेरीज झेप घेऊ शकत नाहीत, हे लक्षात ठेवून त्या शालीसकट हात फैलावून स्वागत करण्याची वृत्ती हवी... मग आपल्यालाही पश्मिन्याचे पंख फुटलेले असतील!

# राज्यस्तरीय व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत श्रीमती सुरेखा पुंजाराम गुंजाळ यांना द्वितीय क्रमांक

## महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

आप्पासाहेब सूर्यवंशी
वाडीवऱ्हे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत





राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या शिक्षकांसाठी राज्यस्तरीय दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत इयत्ता पहिली ते बारावी वर्गांसाठी दर्जेदार व्हिडिओ निर्मिती स्पर्धा राज्यस्तरावरून घेण्यात आल्या यामध्ये तालुका पातळीवर इयत्ता सहावी ते आठवी या गटात भाषा या विषयावर व्हिडिओ निर्मिती त श्रीमती सुरेखा पुंजाराम गुंजाळ यांना दुसरा क्रमांक मिळाला. इगतपुरी तालुक्यातील अनेक तंत्रस्नेही शिक्षकांनी सहभाग नोंदवला . या स्पर्धेचे बक्षीस म्हणून शानदार ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन त्याचप्रमाणे रोख रक्कम देऊन शिक्षकांचा गौरव करण्यात आला. तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री निलेश पाटील साहेब यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी तालुक्यातील सर्व अधिकारी व तंत्रस्नेही शिक्षक सर्व तालुक्यातील विजयी शिक्षक उपस्थित होते.

# अक्षर मानव महिला संमेलन राळेगणसिद्धी येथे मोठ्या उत्साहात संपन्न

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



अक्षर मानव महिला संमेलन दिनांक २५,२६,२७ एप्रिल तीन दिवस राळेगण सिद्धी येथे मोठ्या उत्साहात संप्पन झाले. राही फौंडेशन च्या डॉ सुनीता पोटे व. डॉ संतोष पोटे य संपूर्ण अक्षर मानव आजीवन सदस्य यांनी अतिशय सूत्रबद्ध आयोजन केले. महाराष्टातून अनेक महिला संघटन करणाऱ्या सामाजिक क्षेत्रातून विचारवंत महिलांनी सहभाग घेतला ३ दिवस महिलांनी माहेरपण उपभोगल्याचा आनंद घेतला विशेष म्हणजे हे संमेलन निशुल्क होते भारताचे संविधान म्हणून कार्यक्रमाची सुरुवात करत महिलांच्या अनेक गंभीर विषयांना या संमेलनात मांडले गेले व त्यावरील उपाय योजना यांचा उहापोह करण्यात आला अक्षर मानव संघटनेची संकल्पना ज्यांच्या विचार धारेतून उदयास आली असे प्रसिद्ध लेखक राजन खान यांनी महिलांना रूढी परपंरा यातून बाहेर पडा व तुमचे स्त्री असणे हे खूप सुंदर आहे व तिचे माणुसपण होणे महत्वाचे आहे तिच्यातील निखळ माणूस होऊन जगणे फार सुंदर आहे ते छान जगा असा सल्ला दिला

मातृत्व व वंशाचा दिवा यावर डॉ सुनिताताई पोटे यांनी महिलांना खूप छान मार्गदर्शन केले तसेच संगीताताई नरके यांनी स्त्रियांवरील खरे गंभीर वास्तव याची खूप सुरेख मांडणी केली हर्षदाताई पिलाने, स्वाती ताई मापारी व अरुणभाऊ मापारी यांनी स्त्रियांची फसवणूकीचे ठिकाणे कोणती आहेत व त्यावरील उपाय यावर सर्व महिलांशी संवाद साधले. स्त्री चे व्यक्ती स्वातंत्र्य, लैंगिक शोषण, महिलांचे आर्थिक स्वावलंबन या विषयांना हात घालून त्यावर चर्चा सत्रे करण्यात आली या संमेलनात पुढील ८ कर्तबगार महिलांना ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन तसेच भारताचे संविधान देऊन सन्मानित करण्यात आले निवडपत्र संदर्भ

१.दुर्गा देशमाने,माजलगाव
संविधान प्रचार व प्रसार
२. सुमन साळवे,शिरुर
मजूरांच्या मुलांचे शिक्षण व बहुविध समाजकार्य
३.ज्योती धंदर,बुलढाणा
प्रामाणिक पोलीस अधिकारी व महिला सबलीकरण
४.प्रतिभा इराकशेट्टी, माळ मुरबाड
मतिमंद मुलांची निवासी शाळा
५. मीरा चंद्रकला विठ्ठल सपकाळे,कल्याण
महामाया असंघटित व घरकामगार संघटना - संस्थापक अध्यक्ष
६.शर्वरी सुरेखा अरुण
समाजबंध संस्था, 'प- पाळीचा' द्वारे मुली महिलांमध्ये जागृती
७.प्रज्ञा काटे,बारामती
बाल लैंगिक समस्या
८.वृषाली माने,मुलुंड
संविधान लोकजागर परिषद

राज्य भरातून अनेक विचारवंत लेखक,कवायत्री, वकील, पोलीस, डॉक्टर, काउन्सलर, समाजसेविका, गृहिणी अशा विविध क्षेत्रात उत्तम कामगिरी बाजावलेल्या महिला राज्यभरातून उपस्थित होत्या तसेच अक्षर मानव चे. डॉ संतोष पोटे, सुजित, श्रीकांत डांगे, अजिंक्य किन्हीकर प्रवीण जावळे, जावेदा, डॉ बेंद्रे रश्मी ताई या सर्वांनी संपूर्ण महिला संमेलनास उस्फुर्त सहकार्य केले समाजसेवक अण्णा हजारें यांनीही महिलांशी मुक्तपणे संवाद साधला व. मार्गदर्शन केले असे हे अतिशय यशस्वी, सुंदर ,सुसूत्र आनंदमयी वातावरणात तीन दिवस राज्य भरातून महिलांनी सहभाग घेऊन अक्षर मानव महिला संमेलन संपन्न झाले. माणसाने माणूस मारला या सुंदर कवितेने संमेलनाचा समारोप झाला

## निधन वार्ता

कै. भिमराव पंडित अहिरराव (धाडणे) यांचे दिनांक २३/०४/२०२५ रोजी वार बुधवार ठिक सकाळी ५.४५ वाजता हृदय विकाराने निधन झाले असुन त्यांचे दशक्रिया विधी दिनांक ०३/०५/२०२५ वार शनिवार रोजी राहत्या घरी आयोजित केले आहे.

**शोकाकुल**

भाऊ- रोहिदास पंडित अहिरराव,
गुलाब पंडित अहिरराव
सर्जेराव पंडित अहिरराव
रविंद्र लक्ष्मण अहिरराव
मुलगा - रंजित भिमराव अहिरराव
नातु- लक्ष प्रफुल्ल अहिरराव
मुलगी - सुरेखा व्हि.के. पाटील (बंल्हानेकर)




अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

# सटाणा शहरातील दोधेश्वर पब्लिक स्कूल मधील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परिक्षेत घवघवीत यश

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------------

काही दिवसापूर्वी घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परिक्षेत सटाणा शहरातील नामांकित येथील दोधेश्वर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यावर्षी शिष्यवृत्ती परिक्षेत चांगले यश संपादन केले.



समृद्धी विशाल अहिरे सुमेरा असिफ तांबोळी ऋषिकेश नितीन ठाकरे

**पूर्व प्राथमिक विभागात पात्र विद्यार्थी**

समृद्धी अहिरे -६१.०७%
सुमेरा तांबोळी -५१.६७%
ऋषिकेश ठाकरे -४५.६३%

**पूर्व माध्यमिक विभाग पात्र विद्यार्थी**

तनिष्का इंगळे -५४%
स्वामी पवार -५२%
उर्वशी वाघ -५०%
रिमशा सैय्यद -४१%
शौर्य चव्हाण -४१%

यासर्व पात्र विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष प्रल्हाद पाटील, उपाध्यक्ष प्रा. शांताराम गुंजाळ सर, सचिव श्रीमती मनोहरम्मा सुळू, संचालक भगीरथ पाटील, संजय कोठावदे, धर्मराज धाबळे, प्रवीण सुळू मुख्याध्यापिका श्रुती शेट्टी यांसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांनी अभिनंदन केले आहे. यासर्व विद्यार्थ्यांना शिक्षिका वर्षा जगताप, मुख्याध्यापिका श्रुती शेट्टी यांचे मार्गदर्शन लाभले होते.

# पक्षी आणि प्राणी यांच्यासाठी पांडवलेणी परिसरात पाण्याची व्यवस्था

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------



नाशिक पांडवलेणी येथे सध्या कडक उन्हाळा लागल्याने पशुपक्ष्यांना पाणी मिळणं कठीण झालं अन्नपाण्यासाठी पशुपक्षी-प्राणी वनवन भटकताना दिसत आहे.पाण्यावाचून अनेक वेळा पक्षी-प्राण्यांचा जीवही जातो. पशुपक्षी आहे निसर्गाची लेणी दोन घास, पाणी देऊन फेडू त्यांची देणी उन्हाळ्यात पक्षांसाठी चोचभर पाणी आणि घासभर चारा मिळावा याकरिता पक्षी संवर्धन है काळाची गरज आहे. पांडवलेणी या परिसरात पहाटे व सकाळी मोठ्या प्रमाणात स्थानिक जॉगर्स व पर्यटक येत असतात.यांच्या वतीने नाशिक येथील "पांडवलेणी" थंड हवेच्या या परिसरात चिमणी, कबुतरे, कावळा, कोकिळा, मोर, खारुताई व इतर पक्षी-प्राणी मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांच्यासाठी ठिकठिकाणी सिमेंट व मातीच्या भांड्यात पाणी व त्या शेजारी ज्वारी-बाजरी, तांदूळ, गहू इतर धान्याचीही व्यवस्था करण्यात आली.

विशेष म्हणजे पक्षाला व प्राण्यांना इजा झाल्यास प्राथमिक उपचार करून डॉक्टरांना बोलवले जाते.तसेच सिमेंट व मातीचे भांडे दिवसाआड स्वच्छ करून त्यात स्वच्छ पाणी टाकले जाते आणि वृक्षाला पाणी टाकून त्याचाही काळजी घेतली जाते.जेणेकरून पक्षी, जनावरे, वृक्ष यांना तीव्र उन्हाळ्याचा त्रास जाणवणार नाही. यावेळी अनिल पोटे, प्रकाश माळेकर, प्रतिक करडे, संदीप पाटोळे, प्रणित थिगले, तेजल वैष्णव, अथर्व मटाले, दूर्वा पोटे, विनोद वैष्णव, सुधाकर टाव्हरे,गोरक्षनाथ कासार,प्रविण दोंदे, रितेश देशमुख, प्रमोद पाटील, योगेश मवाळ, स्वरा उपळकर,अमोल उपळकर,ध्रुव देशमुख, दर्शित पाटील, ओम कासार,शैलेश कासार,सत्यजित शिंदे, सुनिल पवार, दिपक खवणे, सचिन कांबळे, योगेश देशमुख, राजेश चौधरी, दीपक दुधवडे, दीपक तातुस्कर,वैजिनाथ पिंपळे,तुषार पवार, स्वप्नील पाटील, योगेश क्षीरसागर, ओम पाटील उपस्थित होते.

# बहुउद्देशीय कासारे विद्यालयातील मुख्याध्यापक के.डी सोनवणे यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ संपन्न

## "जो माणसे जोडतो तोच खरा माणूस जो केवळ पैसा जोडतो तो हैवान"अशी परिस्थिती समाजात दिसते....! प्राचार्य बी. एस.पाटील यांचे प्रतिपादन.

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------



बहुउद्देशीय विद्यालय कासारेचे मुख्याध्यापक के.डी.सोनवणे यांच्या सेवापुर्ती गौरव समारंभ निमित्त अध्यक्षपदावरून ते बोलत होते.पेरेजपूर येथील न्यू इंग्लिश स्कूल येथे हा सोहळा संपन्न झाला.सोहळ्या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून माजी न्यायाधीश
ॲड.जे.टी.देसले, प्रा.एल.जी.सोनवणे,श्री.शिवमहाराष्ट्र प्रतिष्ठान संस्थेचे उपाध्यक्ष दिनकरराव पाटील, सचिव ॲड.एस.जे.भामरे, विश्वस्त श्रीमती.प्रमिला वसंतराव देसले, संजय देसले, प्रताप महाविद्यालय अमळनेरचे उपप्राचार्य डॉ.अमित पाटील,दिलीप काकुस्ते,प्राचार्य पी.एस.सोनवणे, प्राचार्य राजेंद्र अहिरे, डॉ.अशोक पाटील, जे.एम.वाघ, विजय भोसले,डॉ.सचिन नांद्रे, साक्रीचे गटशिक्षणाधिकारी राजेंद्र पगारे, आदर्श मुख्याध्यापक तानाजी शेवाळे, आदर्श राज्य पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक पी.डी.शेवाळे, गटविस्तार अधिकारी
बी.बी.भिल, मुख्याध्यापक अनिल साळुंखे, पर्यवेक्षक व्ही.एम.देवरे, ए.एन.देसले, जे.एच.साळुंके आदी मान्यवर उपस्थित होते.याप्रसंगी प्राचार्य पाटील म्हणाले की,ज्याप्रमाणे जेवढे पाहिजे तेवढे खाणे त्याला प्रकृती म्हणतात जगताना नको तेवढे खातो त्याला विकृती म्हणतात असा प्रकार आपणास धन जमा करतानाही समाजामध्ये दिसतो.जगताना जो स्वतःपुरता जगतो त्याला जीवन म्हणता येत नाही हे पटवून देताना त्यांनी अनेक उदाहरणे याप्रसंगी दिली.कार्यक्रमाचे
प्रास्ताविकातून संस्थेचे सचिव ॲड.एस.जे.भामरे म्हणाले की, शिक्षकाने प्रामाणिकपणे काम करावे अन्यथा ही भावी पिढी कधीच माफ करत नाही.त्याचे फळ नक्कीच मिळते.याप्रसंगी विराज सोनवणे,प्रणाली शेवाळे,,करीना भामरे, चारुशीला तोरवणे या विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक सोनवणे यांच्या विषयीचे अनुभव कथन केले.संस्थेचे उपाध्यक्ष दिनकरराव पाटील,विनोद शेवाळे, रूपाली भदाणे, रवींद्र ठाणगे रवींद्र चिंचोले, शिवाजी शेवाळे,प्रा.एल.जी.सोनवणे,ॲड. जे.टी.देसले,माजी सरपंच मनोज देसले यांनी मनोगत व्यक्त केले. सत्कारमूर्ती के.डी.सोनवणे यांनी भावना विवश होऊन सत्काराला उत्तर दिले.श्री सोनवणे यांचा संस्थेच्या वतीने व नूतन माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालय इंदवे,न्यू इंग्लिश स्कूल पेरेजपूर, बहुउद्देशीय माध्यमिक विद्यालय कासारे या तीनही शाखांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.जिल्हा विज्ञान व गणित मंडळाच्या वतीने जिल्हा विज्ञान मंडळाचे अध्यक्ष प्रमोद कुवर, तालुका अध्यक्ष के.एस.बच्छाव सर्व पदाधिकाऱ्यांनी मुख्याध्यापक श्री सोनवणे यांना सन्मानपत्र प्रदान केले. श्री.सोनवणे यांच्यावर प्रेम करणारे तालुकाभरातून अनेक मुख्याध्यापक,शिक्षक,विज्ञान व गणित मंडळाचे पदाधिकारी, लिपिक, शिक्षकेतर असे असंख्य स्नेही उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक बाळकृष्ण तोरवणे, विलास देसले यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन एच.के. देसले, व्ही. डी. देसले, सौ. एस. एस. देवरे, श्रीमती. एम.बी. सोनवणे, विनोद शेवाळे, विजय बागुल, विकास बोरसे, तुषार सोनवणे,विकास शिंदे,सौ कविता देसले, एम.एन.ओगले, के.एस.गर्दे, यू. व्ही.देवरे,संजय देसले, सुभाष देसले, चंद्रकांत बोरसे, संजय गांगुर्डे, जगदीश देवरे यांनी केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समजून घेण्याची आज खऱ्या अर्थाने गरज:- व्याख्याते डॉ.प्रा. राजाभाऊ भैलुमे

## निघोज येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळा साजरा

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------





भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार काय होते ते समजून घेण्याची आज खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते डॉ.प्रा. राजाभाऊ भैलुमे यांनी व्यक्त केले आहे.पारनेर तालुक्यातील निघोज येथील बुद्धनगर परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वा जयंती सोहळा आंबेडकर स्मृती संघ मुंबई व निघोज ग्रामस्थ यांच्या वतीने साजरा करण्यात आला यावेळी ते बोलत होते. सायंकाळी सात ते रात्री नऊ या दोन तासात बुद्धनगर, मळगंगा मंदीर, ग्रामपंचायत चौक, नवी पेठ, एस टी बसस्थानक ते पुन्हा बुद्धनगर अशी वाद्याच्या दणदणाटात डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याची विद्युत रोषणाई करण्यात आलेल्या भव्य रथात मिरवणूक काढण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय, महात्मा फुले यांचा विजय असो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो. भारत माता की जय या घोषनांनी परिसर निनादूण गेला होता. ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करण्यात येत होती. निघोज ग्रुप ग्रामपंचायत, ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशन, अल्पसंख्याक समाज मंडळ, पारनेर तालुका पत्रकार संघ , मुस्लिम समाज मंडळ यांच्या वतीने तसेच गावकऱ्यांच्या वतीने सचिन पाटील वराळ, मार्गदर्शक सुनिल दादा पवार, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, अल्पसंख्याक समाजाचे नेते अस्लमभाई इनामदार, पत्रकार संघाचे मार्गदर्शक रामचंद्र महाराज सुपेकर यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करीत पुष्पहार अर्पण केला. तसेच एक भव्य मिरवणूक तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे देखणे आणी नियोजनबद्ध पद्धतीने सुंदर नियोजन केल्याबद्दल डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मृती संघाचे अध्यक्ष सेवानिवृत्त डी वाय एस पी सुभाषजी सोनवणे साहेब यांचा सत्कार ग्रामपंचायत चौकात ग्रामपंचायत सर्वेसर्वा सचिन पाटील वराळ यांच्या हस्ते करण्यात आला. डॉ.आंबेडकर जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मृती संघाचे अध्यक्ष तसेच सेवानिवृत्त डी वाय एस पी सुभाष सोनवणे होते. यावेळी नित्यसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा पंचायत समितीचे माजी सदस्य डॉ.भास्करराव शिरोळे, सेवानिवृत्त प्राचार्य रामचंद्र महाराज सुपेकर, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा सचिव विरेंद्र पवार, बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष गिरीश गायकवाड, सरचिटणीस संपत पवार, धम्मपद मॉनेस्ट्री संचालक सचिन नगरे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक बाबाजी वाघमारे, पुणे येथील सेवानिवृत्त अधिकारी बाळासाहेब सोनवणे, सेवानिवृत्त पोलिस अधिकारी दिनेश सोनवणे, सेवानिवृत्त पोलिस अधिकारी दिलीप सोनवणे, कौस्तुभ संस्थेचे संस्थापक बबनराव सोनवणे, विनायक सोनवणे, हिरामण सोनवणे, राहुल वाघमारे, सुनिल सोनवणे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानचे पदाधिकारी सतिश साळवे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष बाबाजी वाघमारे यांनी केले. शेवटी निघोज सोसायटीचे संचालक हिरामण सोनवणे यांनी आभार मानले.

# कास्मीर हत्याकांडाचा निषेधार्थ नांदगाव शहर कडकडीत बंद

सोमनाथ घोंगाणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------



जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे धर्म विचारून आतंकवाद्यांनी निरपराध हिंदू पर्यटकांवर केलेल्या अमानुष हल्ल्याच्या निषेधार्थ सोमवारी नांदगाव शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला . अत्यावश्यक सेवा वगळता शहरातील सर्व व्यापाऱ्यांनी बंदमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन आपला निषेध आणि रोष व्यक्त केला.बंदमध्ये भाजीपाला आणि फेरीवाल्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतल्याने शहरातील रस्ते निर्मनुष्य झाले होते. दुपारी चार वाजता सकाळी हिंदू समाजाच्या वतीने पोलीस निरीक्षक प्रीतम चौधरी यांची भेट घेऊन त्यांना हल्ल्यातील दोषींवर जशास तशी कारवाई करुन जबर धडा शिकवला पाहिजे तसेच. शत्रुराष्ट पाकिस्तान यापुढे असे कृत्य करण्यास धजावणार नाही असा धडा शिकवला पाहिजे अशा आशयाचे निवेदन दिले. यावेळी सकल हिंदू समाजाचे नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते .

# मातेने आपल्या लेकीसाठी दिले स्वतःचे काळीज ( यकृत) मातेचा केला मुंबई येथे सत्कार

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------



मालेगाव येथील योगिनी हिरे वय ३० वर्ष यांना अचानक पोटदुखीचा त्रास झाला तेथील स्थानिक डाॅक्टरांकडुन तपासनी (सोनोग्राफी व इतर चाचण्या)केल्यावर
डाॅक्टरांनी नाशिक जाउन पुढील तपासण्या करण्याचा सल्ला दिला व नाशिक येथे तपासणी दरम्यान तिला यकृतात गंभीर समस्या असल्याचे डॉक्टरांनी सांगितले व यावर पर्याय म्हणजे यकृताची प्रत्यरोपन करणे हा एकच पर्याय उपलब्ध असल्याचे सांगितले व यकृत दाता बाहेरचा मिळणे दुरापास्त असुन यकृत प्रत्यरोपन करणाऱ्यांची मोठी वेटींग लिस्ट असुन तोपर्यंत पेशंट ला थांबवु शकत नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले मग रक्तातील नात्यात आई, वडील, भाऊ जर देत असतील तर लगेच प्रत्यरोपन करणे शक्य होईल असे डाॅक्टरांनी सांगितल्यावर आई कल्पना बाळासाहेब पवार यांनी लगेच संमती दिली व सासरे जिभाउ धर्माजी हिरे,सासु निर्मला जिभाउ हिरे जेठ विशाल हिरे व पती युवराज हिरे यांनी कितीही पैसा लागला तरी चालेल पण सुनेवर पुर्ण उपचार झाले पाहीजेत यासाठी पुर्ण तयारी ठेवली.व नियोजन झाले सर्व नातेवाईक चे आशिर्वाद घेउन मुंबई गाठत पुढील प्रत्यरोपन प्रक्रियेची तयारी सुरु केली अतिशय क्लिष्ट अशी शस्त्रक्रिया आई व मुलीची एकाच वेळी मुंबई येथील ग्लोबल हाॅस्पीटल येथे डाॅ.समीर शाह, डाॅ.गौरव चौबल, डाॅ.मंगल डेम्बी, डाॅ.विवेक तलालकर यांच्या टीम ने जवळपास अठरा तास शस्त्रक्रिया करण्यात आली.यात योगिनी पवार चे पुर्ण यकृत काढुन आई कल्पना पवार चा यकृताचा तुकडा प्रत्यरोपन करण्यात आला.या काळात वडील बाळासाहेब पवार, व भाउ प्रशांत पवार यांची खंबीर साथ लाभली. शस्त्रक्रियेनंतर आज दोन वर्ष झाली आई व मुलगी दोन्ही ठणठणीत बर्या झाल्यात दोघी माय लेकींचा यानिमित्त नानवटी मॅक्स ग्लोबल हाॅस्पीटल गृप तर्फे नुकताच मुंबई येथे सत्कार करण्यात आला. एका मातेने आपले काळीज देत मुलीचे प्राण वाचवले धन्य ती माउली

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

PASSWORD PROTECTED PAGE